


२३ नोव्हेंबरपर्यंत कोकण रेल्वेवर मेगा ब्लॉक

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

दवबिंदूने भिजली पहाट अन् धुक्यांनी सजली सकाळ

पान ८



रत्नागिरी ● शुक्रवार १४ नोव्हेंबर, २०२५ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक ६ ● पाने ८ ● ₹ ५.०० www.prahaar.in epaper.prahaar.in


## सिंहस्थ कुंभमेळा जगाच्या अध्यात्मिक नकाशावर भारताला अधोरेखित करणार

### ५,७५७ कोटी रुपयांच्या विकासकामांचे मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन

**सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकचा चेहरा मोहरा बदलण्याची संधी**

**नाशिक (प्रतिनिधी) :**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये आगामी सिंहस्थ कुंभमेळानिमित्त ५ हजार ६५७ कोटींच्या कामांचा भूमिपूजन सोहळा पार पडला. कुंभमेळ्यानिमित्त सुरू होणाऱ्या विविध विकासकामांमुळे नाशिक शहरासह जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. या कामांमुळे जिल्ह्यातील पायाभूत सोयीसुविधा बळकट होतील. तसंच पर्यटनाला चालना मिळेल, असंही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. तर 'नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ धार्मिक सोहळा नसून, जगाच्या अध्यात्मिक नकाशावर भारताचे स्थान अधिक दृढ करणारा सोहळा ठरेल. राज्य सरकार नियोजनबद्ध आणि दर्जेदार तयारीसाठी कटिबद्ध आहे,' असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी नाशिकमध्ये केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुंभमेळ्याच्या प्रचारासाठी 'डिजिटल कुंभ' ही नवी संकल्पना जाहीर केली आहे. याअंतर्गत सर्व माहिती डिजिटल माध्यमांद्वारे भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येईल. पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तब्बल ५,७५७ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडले. या सोहळ्यासाठी नाशिक शहर सज्ज झाले होते. या सिंहस्थ कुंभमेळ्यात १४०० एकर क्षेत्रावर साधूग्राम उभारण्यात येणार आहे. येथे देशभरातून येणाऱ्या साधुसंतांसाठी सर्व सोयीसुविधांसह निवास व्यवस्था केली जाईल.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याला लक्षात घेऊन शासनाने अल्पकालीन आणि दीर्घकालीन विकास आराखडा तयार केला आहे. या अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता, वाहतूक, सुरक्षा आणि साधुसंतांसाठी निवास व्यवस्था यांसह विविध सुविधा उभारण्यात येणार आहेत. एकूण ५,७५७ कोटी रुपयांच्या प्रकल्पांमध्ये रस्ते, पूल, जलनिस्सारण, स्मार्ट सिटी प्रकल्प, वाहतूक सुधारणा, स्वच्छता योजना आणि नदी पुनरुज्जीवन यांचा समावेश आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गिरीश महाजन, दादाजी भुसे, माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, देवयानी फरांदे, सीमा हिरे, मंगेश चव्हाण, दिलीप बोरसे, राहुल ढिकले, तसेच वरिष्ठ अधिकारी शेखर सिंह, मनीषा खत्री, आयुष प्रसाद, दत्तात्रय कराळे, संदीप कर्णिक, भास्कर पाटील आदी उपस्थित होते.

**नाशिकचा चेहरा मोहरा बदलण्याची संधी**

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, नाशिकचा चेहरामोहरा बदलविण्याची मोठी संधी कुंभमेळ्यामुळे मिळाली आहे. या विकासकामांमुळे शहर स्वच्छ, सुंदर आणि आधुनिक

(पान २ वर)

## नितीश कुमार की तेजस्वी यादव, कोण होणार बिहारचे मुख्यमंत्री !

**निवडणूक निकाल आज जाहीर होणार**

**मुंबई (प्रतिनिधी) :**





गेल्या अनेक दिवसांपासून बिहार विधानसभा निवडणुकीची देशभरात चर्चा होती. ही निवडणूक जिंकण्यासाठी एनडीए तसेच महागठबंधनने पूर्ण ताकद लावली होती. याच निवडणुकीसाठी मतदानाची प्रक्रिया ११ नोव्हेंबर रोजी पार पडली. मतदान संपल्यानंतर वेगवेगळ्या संस्थांनी एक्झिट पोलचेही आकडेही जाहीर केले. या एक्झिट पोलच्या आकड्यांत नेमके कोणाचे सरकार येणार? याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला असून एका संस्थेच्या पोलचा अपवाद वगळता इतर सर्वांनीच भाजपा आणि नितीश कुमार यांच्या एनडीएचे पारडे जड भरणार, असा अंदाज व्यक्त केला आहे. असे असतानाच आता अवघ्या काही तासांत बिहारच्या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्यामुळे आता राजकारणातील हे युद्ध नेमके कोण जिंकणार? हे लवकरच स्पष्ट होणार आहे?

बिहार विधानसभा निवडणूक एकूण दोन टप्प्यांत झाली. एकूण २४३ जागांसाठी ही निवडणूक आयोजित करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात विधानसभेच्या एकूण १२१ तर दुसऱ्या टप्प्यात एकूण १२२ जागांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात आली. पहिल्या टप्प्याचे मतदान ६ नोव्हेंबर रोजी तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबर रोजी पार पडले. आता १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणीनंतर कोणाचे सरकार येणार हे स्पष्ट होणार आहे.

**प्रशांत किशोर शब्द पाळणार का?**

बिहारची विधानसभा निवडणूक यावेळी विशेष होती. एनडीए विरुद्ध महागठबंधन अशी ही सरळ निवडणूक होती. परंतु राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनीदेखील या निवडणुकीत उडी घेत अनेक जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. विशेष म्हणजे त्यांनी केलेला आक्रमक प्रचार आणि नितीश कुमार यांच्यावर केलेला हल्लाबोल यामुळे बिहारमधील राजकारण बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. त्यामुळे यावेळी नेमके कोण बाजी मारणार, याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. भाजपा, नितीश कुमार यांचा

(पान २ वर)

## वेचक

### फ्रीचे वायफाय वापरणे पडेल महागात!

**मुंबई :** रेल्वे स्टेशन, एअरपोर्ट, कॅफे किंवा शॉपिंग मॉल्स अशा सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असलेले पब्लिक वाय-फाय वापरणाऱ्यांमध्ये तुम्हीही असाल, तर वेळीच सावध व्हा! तंत्रज्ञान क्षेत्रातील महाकाय कंपनी गुगलने आता सार्वजनिक वाय-फाय वापरणाऱ्यांसाठी थेट गंभीर धोक्याचा इशारा जारी केला आहे. गुगलचे म्हणणे आहे की, हे पब्लिक वाय-फाय नेटवर्क्स पूर्णपणे असुरक्षित असतात आणि सायबर गुन्हेगारांसाठी लोकांना त्यांच्या जाळ्यात ओढण्याची ही एक मोठी संधी ठरते. गुगलने नुकत्याच जारी केलेल्या 'एण्ड्राईड : बीहाईंड द स्क्रिन' रिपोर्टमध्ये या धोक्याचा विशेष उल्लेख केला आहे. सायबर क्रिमिनल्स पब्लिक वाय-फायच्या असुरक्षित नेटवर्कचा फायदा घेतात. या माध्यमातून ते लोकांचे बँक खात्याचे लॉग-इन डिटेल्स, खासगी डेटा आणि गोपनीय गप्पांचे संदेश यांसारखी संवेदनशील माहिती अगदी सहज चोरू शकतात. मोबाईलवरील फसवणुकीचे प्रमाण वाढत असताना, पब्लिक वाय-फायचा वापर अधिक धोकादायक ठरत आहे.

### असोसिएशन ऑफ ऑल इंडियन यूनिव्हर्सिटीजकडून अल फलाह विद्यापीठाचं सदस्यत्व रद्द

**नवी दिल्ली :** द असोसिएशन ऑफ ऑल इंडियन यूनिव्हर्सिटीकडून अल फलाह विद्यापीठाचं सदस्यत्व रद्द करण्यात आलं आहे. त्यासाठी गुड स्टँडिंगची कमतरता असं कारण देण्यात आलं आहे. द असोसिएशन ऑफ इंडियन यूनिव्हर्सिटीजनं म्हटलं की त्यांच्या उपनियमानुसार सर्व विद्यापीठांनी गुड स्टँडिंग्जचं मध्ये असणं आवश्यक आहे. मात्र, मीडिया रिपोर्टसनुसार अल फलाह विद्यापीठ, फरिदाबाद हरियाणामध्ये गुड स्टँडिंग्जचा अभाव असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळं द असोसिएशन ऑफ इंडियन यूनिवर्सिटीकडून अल फलाह विद्यापीठ फरिदाबाद हरियाणाचं सदस्यत्व तातडीनं रद्द करण्यात आलं आहे.

(पान २ वर)

### 'विचारा इस्लाम'ची होणार कसून चौकशी

**नागपूर :** अमरावती शहरात लागलेल्या विचारा इस्लाम या पोस्टरची गंभीर दखल राज्याचे महसूलमंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतली असून, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्याकडे अहवाल मागितला असून

(पान २ वर)

## नवले पुलावरील विचित्र अपघातात सात जणांचा मृत्यू

### चालत्या कंटेनरने अचानक ब्रेक दाबला, भरधाव कार मागून धडकली, कारच्या मागून दुसरा कंटेनर घुसला

**पुणे (प्रतिनिधी) :**



पुणे - बंगळुरू महामार्गावरील नवले पूल परिसरात पुन्हा एकदा भीषण अपघाताने हाहाकार माजला आहे. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास दोन कंटेनर आणि एका कारचा जबरदस्त अपघात झाला. या अपघातानंतर दोन्ही कंटेनरना अचानक आग लागली असून त्यांच्या मधोमध एक कार अडकली. या अपघातानंतर लगेचच आग भडकल्याने कारमधील सर्व नागरिकांचा जळून मृत्यू झाला. दरम्यान, या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी

(पान २ वर)

## संगमेश्वर येथील मोबाईल शॉपी फोडणाऱ्या सराईत गुन्हेगाराला शहापूर येथून अटक

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची मोठी कारवाई**

### राजापुरातील मोटारसायकल चोरीचीही दिली कबुली

**रत्नागिरीः (वार्ताहर)**



जिल्ह्यातील चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन दत्तात्रय बगाटे आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. बी. बी. महामुनी यांनी दिलेल्या सक्त सूचनांनुसार, रत्नागिरी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (LCB) मोठी कारवाई केली आहे. संगमेश्वर येथील मोबाईल शॉपी फोडणाऱ्या सराईत गुन्हेगाराला LCB च्या पथकाने ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथून अटक केली आहे. या आरोपीच्या अटकेमुळे राजापूर येथील एका मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचीही उकल झाली आहे.

दिनांक ०८ ऑक्टोबर ते ०९

(पान २ वर)

## दिल्ली बॉम्बस्फोटाची तार सोलापूरच्या आयटी अभियंत्यापर्यंत

**कोंढवा आणि मुंब्रा येथे एटीएसची कारवाई; दोन संशयित ताब्यात**

**सोलापूर (वृत्तसंस्था) :**

दिल्लीतील अलीकडील बॉम्बस्फोट प्रकरणानंतर महाराष्ट्रातील दहशतवादविरोधी पथक (एटीएस) सतर्क झाले असून, तपासाची सूत्रे सोलापूरपर्यंत पोहोचली आहेत. एटीएसने पुण्याच्या कोंढवा आणि ठाण्याच्या मुंब्रा परिसरात संयुक्त कारवाई करून दोन संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या कारवाईचा संबंध सोलापूरच्या आयटी अभियंता जुबेर हंगरगेकर या संशयित व्यक्तीशी जोडला जात असल्याची माहिती पुढे आली आहे. हंगरगेकरचा अल-कायदाशी संबंध असल्याचा प्राथमिक संशय तपास पथकाने व्यक्त केला आहे.

एटीएसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या कारवाईदरम्यान संशयितांकडून

(पान २ वर)

## दै. प्रहारचे मंडणगड प्रतिनिधी व निर्भिड पत्रकार विजय पवार यांचे दु:खद निधन

**खेड (प्रतिनिधी)**



मंडणगड तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात आपले वेगळे आणि ठसठशीत स्थान निर्माण केलेले प्रहार वर्तमानपत्राचे तालुका प्रतिनिधी व मंडणगड पत्रकार संघाचे अध्यक्ष पत्रकार विजय पंढरीनाथ पवार यांचे आज गुरूवारी पहाटे ४.३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने सर्वसामान्यांच्या प्रश्नांना आवाज देणारा आणि अन्यायाविरूद्ध लढणारा निर्भीड पत्रकार हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

विजय पवार यांनी २००७ साली दै. तरुण भारत मधून रिपोर्टर म्हणून पत्रकारितेची कारकीर्द सुरू केली. यानंतर २००९ साली त्यांनी दैनिक प्रहार मध्ये तालुका प्रतिनिधी म्हणून कामाला सुरुवात केली. गेली सतरा वर्षे ते प्रहारचे मंडणगड तालुका प्रतिनिधी म्हणून अत्यंत तत्परतेने व प्रामाणिकपणे कार्यरत होते. ग्रामीण भागातील प्रश्न, अडचणी, तक्रारी आणि विकासाच्या अपेक्षा यांची खरी ओळख करून देणारे पत्रकार विजय पवार हे गावकुसाबाहेर त्यांच्या लेखणीमुळे पोहोचले होते. मंडणगडसारख्या विस्तीर्ण, वेगवेगळ्या भौगोलिक मर्यादांमध्ये विभागलेल्या तालुक्यातून जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी निःस्वार्थीपणे, खडतर परिस्थितीतही त्यांनी केलेले काम मोठे होते. विजय पवार यांची

(पान २ वर)

## आरवली येथे बस प्रवासादरम्यान विरारमधील प्रवाशाचा मृत्यू

**संगमेश्वर (प्रतिनिधी)**

संगमेश्वर तालुक्यातील आरवली येथे मुंबई-गोवा महामार्गावर धक्कादायक घटना घडली आहे. खासगी बसमधून प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाचा प्रवासादरम्यान मृत्यू झाला आहे. सखाराम बाळू दाभोळकर असे मृताचे नाव आहे. ही घटना १३ नोव्हेंबर रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास घडली.

मृत व्यक्तीचे नाव सखाराम बाळू दाभोळकर (वय ४५ , रा.जीवधन फुलपाडा, ता.विरार, जि.पालघर) असे असून ते मुंबईहून रत्नागिरीकडे जाणाऱ्या खासगी बसमधून प्रवास करत होते. प्रवासादरम्यान त्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने बसचालक सचिन गोविंद शेट्ये यांनी तत्काळ बस आरवली गावात थांबवून ग्रामीण रुग्णालयात त्यांना दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेची नोंद संगमेश्वर पोलीस ठाण्यात झाली असून, पोलीस सी.बी. मनवल हे अधिक तपास करीत आहेत.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन निर्णयांमुळे देशाची जागतिक स्पर्धात्मकता बळकट होईल- पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली :**



जागतिक व्यापार अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्यातीला चालना देण्यासाठी भारत सरकारने जाहीर केलेल्या ४५,००० कोटी रुपयांच्या बूस्टर पॅकेजचे वर्णन जागतिक स्पर्धात्मकता सुधारणारे पाऊल असल्याचे केले. ते म्हणाले की, केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन निर्णयांमुळे देशाची जागतिक स्पर्धात्मकता बळकट होईल, पुरवठा साखळी मजबूत होईल आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

तीन वेगवेगळ्या एक्स पोस्टमध्ये, पंतप्रधानांनी सांगितले की, हे निर्णय स्वावलंबी भारताचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. पंतप्रधान म्हणाले की, मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या निर्यातदारांसाठी क्रेडिट हमी योजनेमुळे निर्यातदारांना सुरळीत

(पान २ वर)

## दिल्ली स्फोट : प्रवाशांना एक तास आधी स्टेशनवर पोहोचण्याचा पोलिसांचा सल्ला

**मेट्रो स्टेशनवर २० मिनिटे आणि विमानतळावर ३ तास आधी पोहोचा**

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

स्फोटांनंतर दिल्लीत वाढलेल्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर, दिल्ली पोलिसांनी गुरुवारी प्रवाशांसाठी एक सूचना जारी केली, ज्यामध्ये सुरक्षा तपासणीमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी त्यांना रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके आणि विमानतळांवर लवकर पोहोचण्याचे आवाहन केले आहे.दिल्लीचे सह पोलीस आयुक्त मिलिंद डुंबेरे यांनी एका सूचनापत्रात म्हटले आहे की, दिल्लीत सुरक्षा वाढवण्यात आली आहे. रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके आणि विमानतळांवर प्रवाशांची तपासणी केली जात आहे. त्यामुळे, रेल्वे

(पान २ वर)

## भारतीय वास्तुविशारद संस्थेचे केंद्र रत्नागिरीत सुरू होणार

### १०८ वर्षांची संस्था प्रथमच रत्नागिरीत, कोकणासाठी मोठी संधी उपलब्ध

**रत्नागिरी (विशेष प्रतिनिधी)**

भारतीय वास्तुविशारद संस्था (IIA) ही भारतातील वास्तुविशारदांची राष्ट्रीय व्यावसायिक संघटना आहे. १९१७ साली स्थापन झालेल्या या संस्थेचे रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रत्नागिरीत 'रत्नसिंधू केंद्र' सुरू होणार आहे, ही कोकणासाठी मोठी उपलब्धी आहे, अशी माहिती या केंद्राचे मानद संचालक मार्गदर्शक आर्किटेक्ट संतोष तावडे यांनी दिली.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात वास्तुविशारद (आर्किटेक्ट) म्हणून अनेक जण कार्यरत आहेत. या सर्वांना एकत्रित आणून हे केंद्र सुरू करण्यासाठी गेली दोन-तीन वर्षे प्रयत्न सुरू होते. आता त्याला यश आले आहे. यामुळे आर्किटेक्ट क्षेत्राकडे जिज्ञासू युवा पिढी वळेल. तसेच आर्किटेक्चर संदर्भाने समाजाच्या गरजा पूर्ण

(पान २ वर)

## वादळाच्या लाटेत नौकेला जलसमाधी

**पाच खलाशी बचावले, एक बेपत्ता**

**मुंबईः** अरबी समुद्रात वादळी हवामान आणि प्रचंड लाटांच्या तडाख्यात बोटीत पाणी घुसल्याने 'अमृत-१६' नावाची मदत-नौका पाण्यात बुडाली आहे. या दुर्घटनेत सहा खलाशांपैकी पाच जणांना तटरक्षक दलाने वाचवण्यात यश आले.तर एक खलाशी अद्याप बेपत्ता आहे. या दुर्घटनेने किनारपट्टीवरील

(पान २ वर)

## 'स्थानिक' निवडणुकांमध्ये पिपाणी चिन्ह वगळले

**केंद्रीय निवडणूक आयोगाचा शरद पवारांना दिलासा**

**मुंबई (प्रतिनिधी) :**



शरद पवारांना केंद्रीय निवडणूक आयोगाने गुरुवारी मोठा दिलासा दिला आहे. शिवसेनेच्या पक्षचिन्हावरुन वाद सुरु असतानाच शरद पवारांना पक्षचिन्हावरुन मोठा दिलासा देण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस

(पान २ वर)

## जिल्ह्यातील अन्न सुरक्षा रामभरोसे !

### दूध, मसाले, खाद्यतेल, मिठाई, दुग्धजन्य पदार्थ, पनीरला भेसळचा विळखा

**प्रशांत हरचेकर (रत्नागिरी)**

जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून, अन्नसुरक्षा यंत्रणा अक्षरशः रामभरोसे चालली आहे. सणासुदीनंतरही भेसळचा विळखा अधिकच घट्ट झाला आहे. दूध, मसाले, खाद्यतेल, मिठाई, पनीर, दुग्धजन्य पदार्थ अशा सर्वच जीवनावश्यक वस्तूंमध्ये भेसळखोरीचं सावट गडद झालं आहे. या सर्वांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर थेट आघात होत असून, प्रशासन मात्र केवळ कारवाईच्या कागदोपत्री गोष्टींपलीकडे जाताना दिसत नाही.

**अन्नपदार्थांचा दर्जा खालावला**

शहरातील आणि ग्रामीण भागातील किराणा दुकाने, चायनीज गाड्या, मिठाई दुकानं याठिकाणी वापरले जाणारे पदार्थ अत्यंत निकृष्ट दर्जाचे



आहेत. काही ठिकाणी निकृष्ट खाद्यतेल, रंगद्रव्यांचा वापर, अस्वच्छता आणि जुने पदार्थ पुन्हा विक्रीसाठी ठेवले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक दुकानांत 'बेस्ट बिफोर' मुदतीत शिथिलता दाखवून शिळी मिठाई विकली जात आहे. गुहागर येथे काही महिन्यांपूर्वी शिळी मिठाई दिल्याने एकाचा मृत्यू झाला होता, तरी पुढील कारवाई अंधारात आहे.

**मसाले, तेल, मिठाईत विषारी रंगद्रव्ये**

हळद, मिरची पावडर, गरम मसाले, हिंगमध्ये सिंथेटिक रंग, विटांची भुकटी आणि विविध रासायनिक घटक मिसळले जात असल्याच्या तक्रारी आहेत. तर शेंगदाणा, सोयाबीन, सूर्यफूल आणि मोहरीच्या तेलात अधिक चमक आणण्यासाठी रासायनिक प्रक्रिया केल्या जात आहेत. यामुळे लिव्हर, हार्ट आणि किडनीचे आजार वाढत आहेत.

**चायनीज गाड्यांची अराजकता**

शहरातील अनेक चायनीज गाड्यांवर निकृष्ट तेलाचा वापर

(पान २ वर)